# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## सुरक्षा रक्षक पुरवठा करणेबाबत

## ई-निविदा सुचना क्र.- १, सन २०२६

**जा.क्र.गो.वि./वि.ले.वि./ ५९४ /२०२६ दिनांक:- १५/०५/२०२६**

गोंडवाना विद्यापीठातील विद्यापीठ परिसर, विद्यापीठ परिसरातील सर्व ईमारती, मा. कुलगुरूंचे निवासस्थान, विद्यापीठ जंगम व स्थावर मालमत्तेचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने कंत्राटी सुरक्षा रक्षक किमान वेतनावर १२ महिण्यासाठी उपलब्ध करून देण्याकरीता नोंदणीकृत पात्र ठेकेदार/पुरवठादारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदेसंदर्भातील सविस्तर माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाचा कालावधी (महिण्यात) | अनामत रक्कम(रू.) | को-या निविदासंचाची किंमत (रू.) |
|---|---|---|---|---|
| १ | गोंडवाना विद्यापीठाकरीता गरजेनुसार सुरक्षा रक्षक पुरवठा करणे | १२ | २,००,०००/- | रू. २३,६००/- (विनापरतावा) |

ठेक्याची मुदतकमी अथवा जास्त करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे. याबाबतीत विद्यापीठ प्रशासन जो निर्णय घेईलतो संबंधीत ठेकेदारावर बंधनकारक राहील. या ठेक्याची मुदतकरारातील अटी व शर्ती कायम ठेऊन गरजेनुसार विद्यापीठ आणि ठेकेदार यांच्या संमतीने मुदत वाढविली जाऊ शकेल. तसेच कोणतेही कारण न देता एका महिण्याची नोटीस देवून ठेका रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठाकडे राहील व याबाबत कोठेही उजर राहणार नाही. तसेच उपरोक्त निविदा ह्या कुठल्याही स्तरावर कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा विद्यापीठास अधिकार राहील.

१. कोरी निविदा, अटी व शर्तीसह महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवरून डाऊनलोड करता येईल. सदरकामाकरीता **रूपये २३,६००/- (रू. तेविस हजार सहाशे फक्त) इतकी रक्कम निविदा संचाचे ना परतावा शुल्क असूनसदर शुल्क वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे नांवे online पध्दतीने भरणा करून निविदेसह सादरकरणे आवश्यक आहे.**

२. पात्र इच्छुक ठेकेदारांनी ई-निविदा डाऊनलोड करण्यासाठी व ई-निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेण्यासाठी www.mahatenders.gov.in पोर्टलवर Enroll करणे आवश्यक आहे.

३. या संदर्भात ई-निविदा ऑनलाईन भरण्याबाबत अथवा डिजीटल प्रमाणपत्र मिळणेबाबत काही शंका/अडचणी असल्यास संबंधीतांनी मोफत दुरध्वनी क्र. ०१२०-४२००४६२, ०१२०-४००१००२, ०१२०-४००१००५, ०१२०-६२७७७८७ या क्रमांकावर संपर्क करावा.

४. वरील कामाची ई-निविदा सूचना गोंडवाना विद्यापीठाच्या unigug.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच ई-निविदा सूचना व अटी व शर्तीसह निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यास व भरण्यास उपलब्ध आहे.

५. सदर व्यवहारात काही कारणास्तव अटी व शर्तीचा भंग झाल्यास विधीवत कार्यवाही करण्याची आवश्यकता पडल्यास, प्रकरण न्यायप्रविष्ठ झाल्यास त्याची क्षेत्रमर्यादा गडचिरोली न्यायालयात मर्यादेत राहील. या प्रकरणी होणारा खर्च निविदाधारकाने भरलेल्या अनामत रक्कमेतून केला जाईल.

६. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासकिय आदेशसदर निविदेकरीता लागू राहतील.

७. इतर अटी व शर्ती ई-निविदामध्ये पाहावयास मिळतील

८. अंदाजेसुरक्षा रक्षकांची संख्या :- **अकुशल ३३**

९. **MSME** (Ministry of Micro, Small and Medium Enterprises) नोंदणीकृत एजन्सीसाठी EMD आणि Tender Fees मध्येसुट दिली जाईल. परंतू याबाबतचे पंजीकरणहे याच कार्यासाठी असणे बंधनकारक राहील व त्याप्रमाणे MSME चे त्याबाबतचे प्रमाणपत्रात स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक राहील अन्यथा रीतसर शुल्क व EMD भरणे अनिवार्य आहे. तसे नसल्यास निविदा तांत्रिक बीड मध्ये बाद टरविल्या जाईल याची नोंद घ्यावी. Human Resource Provision and Management of Human Resource Function Should be mentioned in MSME Certificate.

१०. **परिशिष्ट ब** मध्ये दर्शविल्या नुसार जोडावयाची कागदपत्रे निविदेत कोणत्या क्रमांकावर जोडलेली आहे त्याचा पृष्ठक्रमांक दर्शविणे बंधनकारक राहील. जे निविदाधारक पृष्ठक्रमांक दर्शविणार नाही किंवा दर्शविलेल्या पृष्ठ क्रमांकावर सदर कागदपत्रे न आढळल्यास निविदाधारकाने कागदपत्रे जोडलेली नाही असे समजण्यात येईल. अशा निविदाधारकास निविदा प्रक्रियेतून तांत्रिकदृष्ट्या अपात्र करण्यात येईल तसेच **परिशिष्ठ ब** निविदेच्या पहिल्या क्रमांकावर जोडावे.

११. ई-निविदा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 01 | ई-निविदा प्रकाशीत करण्याची तारीख व वेळ | १५/०५/२०२६ | ०५.०० pm |
| 02 | ई- निविदा डाऊनलोड करण्याची तारीख व वेळ | १५/०५/२०२६ | ०५.०० pm |
| 03 | ई-निविदा सादरकरण्याची अंतिम तारीख व वेळ | ३०/०५/२०२६ | ०५.३० pm |
| 04 | ई-तांत्रिक लिफाफा उघडण्याची तारीख व वेळ **(शक्य झाल्यास)** | ०१/०६/२०२६ | ०४.३० pm |
| 05 | ई-दराचा लिफाफा उघडण्याची तारीख व वेळ **(शक्य झाल्यास)** | ०३/०६/२०२६ | १२.०० pm |

१२. सेवा सहकारी संस्था/बचत गट यांनी सहकार क्षेत्रातील पंजीकरण प्रमाणपत्र, परिशिष्टावर असलेल्या नोंदणीकृत पदाधीकारी व सदस्यांची जाहिराती नंतरच्या तारखेचे नंतरचे परिशिष्ट तसेच उपविधी कायदा ईत्यादींची संबधित सरकारी कार्यालयाव्दारे प्रमाणीत प्रत आवश्यक राहील.

१३. संस्था/बचतगट यांची जाहिरातीच्या नंतरची ठरावाची प्रमाणीत प्रत आवश्यक.

१४. संस्था/बचतगट यांचे मागीलतीन आर्थीक वर्ष २०२४-२५, २०२३-२४, २०२२-२३ अंकेक्षीय नफा-तोटा पत्रक सनदी लेखापाल यांचे स्वाक्षरीसह जोडावे

१५. बँकेच्या पासबुकची प्रमाणीत छायाप्रत मागीलसहा महिण्याच्या उलाढालीसह

१६. निविदाकाराच्या फर्मचे नांव पॅन व GST नोंदणी प्रमाणपत्र

१७. सहकारी संस्था/बचत गट यांचे नांव पॅनकार्ड तसेच GST प्रमाणपत्र.

१८. खाजगीसुरक्षा यंत्रणा पसारा ॲक्ट २००५ नुसार विशेष पोलीस महानिरीक्षक यांचेकडुन वैध परवाना.

15/5/26

**सहायक कुलसचिव (भांडार)**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली (म.रा.)

**विद्यापीठ स्थावर व जंगम मालमत्तेच्या सुरक्षीततेकरीता सुरक्षा रक्षक पुरविण्याबाबत ई-निविदा सुचना.**

**क्र./गों.वि./सुरक्षा रक्षक/विलेवि/५९४/२०२६** **दि. - १५/०५/२०२६**

गोंडवाना विद्यापीठातील विद्यापीठ परिसर, विद्यापीठ परिसरातील सर्व ईमारती, मा. कुलगुरूंचे निवासस्थान, विद्यापीठ जंगम व स्थावर मालमत्तेचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने कंत्राटी सुरक्षा रक्षक किमान वेतनावर १२ महिण्यासाठी उपलब्ध करून देण्याकरीतानोंदणीकृत पात्र ठेकेदार/पुरवठादारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे. ई-निविदा शुल्क, अनामत रक्कम व इतर अटी व शर्तीकरीता सविस्तर ई-निविदा सूचना विद्यापीठाच्या https://www.unigug.ac.inया अधिकृत संकेतस्थळ वर उपलब्ध आहे. तसेच ई-निविदा सूचना आणि अटी व शर्तीसह निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यास व भरण्यास दिनांक १५/०५/२०२६ते दिनांक-३०/०५/२०२६ पर्यंत उपलब्ध आहे.

ई-निविदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा/नाकारण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

**स्वा/-**

दिनांकः- १५/०५/२०२६
ठिकाण :- गडचिरोली

**सहायक कुलसचिव (भांडार)**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

Signature Not Verified

Digitally signed by AMOL BALAJI KHODAWE
Date: 2026.05.15 15:04:27 IST
Location: Maharashtra-MH